पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, शुक्रवार, ३ मे २०१९

# पुण्यातील विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

## ‘सीबीएसई’ बारावीत अनेक शाळांचे निकाल १०० टक्के

**प्रतिनिधी, पुणे**

**केंद्रीय माध्यमिक** शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत पुण्यातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून यश मिळवले. बऱ्याच शाळांचे निकाल १०० टक्के लागले, तर अनेक विद्यार्थ्यांनी ९०-९५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवून बारावीचा अडथळा सहजच पार केला.

केंद्रीय विद्यालयांसह सीबीएसईशी संलग्न असलेल्या शहरातील अनेक खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनीही सीबीएसईची परीक्षा दिली होती. दिघी येथील आर्मी पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. या शाळेच्या साहिल मोहिते या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याने ९४.४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला, तर वाणिज्य शाखेच्या खुशी सचदेवने ९२ टक्के, कला शाखेच्या रम्या आर. या विद्यार्थिनीने ९१.८ टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळवले.

महमंदवाडी येथील दिल्ली पब्लिक स्कूलचा निकालही १०० टक्के लागला. ७७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले, तर १३० विद्यार्थ्यांना ८० टक्क्यांपेक्षा जास्त, तर १३३ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. शुभा मुखर्जीने ९७.८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. तसेच, संस्कृती स्कूलच्या सर्व शाखांचा निकाल १०० टक्के लागला. आदित

गुणांसह अग्रस्थान पटकावले, तर सिद्धार्थ मुंगळेने ९३.२ टक्के गुणांसह द्वितीय आणि स्नेहल कौशलने ८८.८ टक्के गुणांसह तृतीय स्थान प्राप्त केले. सर्वच विद्यार्थ्यांना ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. डीएव्ही पब्लिक स्कूलच्या स्नेहा गोंडुकुपी या विद्यार्थिनीने ९७.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला, तर ऋत्विक गोयल या अपंग विद्यार्थ्याने ८१.६ टक्के गुण प्राप्त केले. शाळेचे एकूण १०१ विद्यार्थी आणि ११४ विद्यार्थिनी उत्तीर्ण होत निकाल १०० टक्के लागला. केशवनगरच्या द ऑरबिस शाळेतील २४ टक्के विद्यार्थ्यांनी ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. शाळेचा एकूण निकाल १०० टक्के आहे. त्यात विज्ञान शाखेच्या हिमांशू कोरडेने ९५.२ टक्के, वाणिज्य शाखेच्या पीयूष वर्माने ८६.६ टक्के, कला शाखेच्या राशी सिंगने ८९ टक्के गुण मिळवले.

खडकीच्या आर्मी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनीही १०० टक्के निकालासह यश मिळवले. त्यात विज्ञान शाखेच्या विभु शर्माने ९७.६ टक्के, वाणिज्य शाखेच्या सौरभ जाधवने ९६.४ टक्के, कला शाखेच्या अनुष्का कृष्णाने ९७.८ टक्के गुण प्राप्त केले. पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल ९७ टक्के लागला असून, द्रिष्टी पेशवाणीने सर्वाधिक ९६.८ टक्के गुण मिळवले. ९ विद्यार्थ्यांना ९५ टक्क्यांहून अधिक, ३२ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक, तर ६३

गुण मिळाले. तसेच ब्लॉसम पब्लिक स्कूलच्या १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. ९८ टक्के गुणांसह तेजस साबळेने अग्रस्थान मिळवले, तर श्रुती सूर्यवंशी आणि रसलीन कौर यांनी ९४.८ टक्के गुण मिळवले. वानवडीच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील परीक्षा दिलेले सर्व १९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी ३९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. श्रेयस सहारेने ९६.४ टक्के गुणांसह पहिला क्रमांक मिळवला. विखे पाटील शाळेच्या विज्ञान शाखेतील मृण्मयी नेरलीकरने ९८ टक्के गुणांसह अग्रस्थान पटकावले. शाळेचे सर्व ६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

EXPRESS Careers

AISSMS
ALL INDIA SHRI SHIVAJI MEMORIAL SOCIETY
PREMIER HERITAGE GROUP OF INSTITUTES
Kennedy Road, Near RTO Office, Pune - 411001
Tel : 020-26058342, 26058587 www.aissmscoe.com

FACULTY RECRUITMENT

All India Shri Shivaji Memorial Society (AISSMS) invites applications for the posts of Professor / Associate Professor / Assistant Professor in • Chemical • Civil • Computer • Electrical • E&TC • Information Technology • Instrumentation • Mechanical • Production Engineering • Applied Chemistry • Applied Physics • Engineering Mathematics • Training & Placement Officer and Assistant Workshop Supdt. at AISSMS College of Engineering and Institute of Information Technology, purely on temporary and adhoc basis.

**Qualification :** As per AICTE, DTE, Savitribai Phule Pune University norms.

Filled application in prescribed format available under Job on website **www.aissmscoe.com** alongwith self attested photo copies of all certificates should be submitted within seven days from the date of publication of this advertisement to "The Principal, AISSMS College of Engineering, Kennedy Road, Pune-411001".

Shri Malojiraje Chhatrapati